॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२४–२५/४६३ दिनांक : २८/०३/२०२५

परिपत्रक

प्रति,
मा. संचालक/विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणिक संकुले व प्रशासकिय विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४–२५ संकलन विशेष मोहिमे बाबत.
संदर्भ: श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड यांचे जा.क्र.१३०४/जिसैकका/स.से.ध्व.नि.–२०२४–२५/१९, दिनांक २०/०३/२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड यांनी मा. जिल्हाधिकारी महोदयाच्या अर्धशासकिय पत्र क्र. १३०४/जिसैकका–४/२०२४–२५ दिनांक १०/१२/२०२४ आणि अवाहन पत्राच्या अनुषंगाने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४–२५ करिता नांदेड जिल्हयासाठी १ कोटी रूपये इतके संकलन जमा करण्याचे उद्दिष्ट मा. जिल्हाधिकारी, "अध्यक्ष" जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती, नांदेड यांनी निश्चित केले आहे. तसेच संकलनाची रक्कम 100% पुर्ण करण्याचे आवाहन मा. जिल्हाधिकारी महोदयांनी केले आहे. त्यानुषंगाने आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून म. जिल्हाधिक–यांच्या आवाहन पत्रात नमुद केल्याप्रमाणे रक्कम कपात करून संकलित झालेला निधी/रक्कम रोखीने/धनादेश स्वरूपात "जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय आवार, नांदेड" यांच्या नावाने बनवून जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, तहसिल कार्यालय, नांदेड यांचेकडे तात्काळ जमा करून या राष्ट्रीय कार्यास मोलाचे योगदान देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

तरी त्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुले व प्रशासकिय विभाग यांना सुचित करण्यात येते की, आपल्या संकुलातील व प्रशासकिय विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केलेल्या उपरोक्त आवाहनाच्या अनुषंगाने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४–२५ निधी/रक्कम रोखीने/धनादेश स्वरूपात "जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नांदेड" यांच्या नावाने बनवून जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, तहसिल कार्यालय आवार, नांदेड यांचेकडे तात्काळ जमा करण्यात यावा ही, विनंती.

(अधिक **माहितीसाठी**: सु.ऑ.कॅप्टन विठ्ठल कदम (निवृत्त) कल्याण संघटक (मोबाईल नं. ८६९८७३८९९८) आणि सार्जंट अनिल देवझे (निवृत्त) लिपीक (मोबाईल नं. ८७०७६०८२८३)

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner

CE-1092.
Dt. 25/03/2025.

## मा.जिल्हाधिकारी महोदयांच्या मान्येतेने

दुरध्वनी : ०२४६२-३५९०५६
ई-मेल- zswonanded@gmail.com

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय
तहसिल कार्यालय आवार, नांदेड - ४३१६०१

जा.क्र. १३०४/जिसैकका/स.से.ध्व.नि.-२०२४-२५/ 19

दिनांक - 20/03/2025

मा. कुलगुरु,
स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड.

(3)
26/3/2024

OFFICE OF THE VICE-CHANCELLOR
S.R.T.M.U., Nanded - 431 606
Inword No. 9434
Date of Received: 26/03/25
Time : Sign. :

विषय : **सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४-२५ संकलन विशेष मोहीम**

१. संदर्भ - मा.जिल्हाधिकारी महोदयांचे **अर्धशासकिय पत्र** क्रं. १३०४/जिसैकका-४/२०२४-२५ दिनांक १०/१२/२०२४ आणि **आवाहन पत्र** (सोबत जोडले आहे).

२. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४-२५ करिता नांदेड जिल्हयासाठी १ कोटी रुपये इतके संकलन जमा करण्याचे उद्दिष्ट मा. जिल्हाधिकारी, "अध्यक्ष" जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती, नांदेड यांनी निश्चित केले आहे. तसेच संकलनाची रक्कम १००% पुर्ण करण्याचे आवाहन मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी केले आहे.

३. या अनुषंगाने आपणांस विनंती आहे की आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनातून मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या **आवाहन पत्रात** नमूद केल्याप्रमाणे रक्कम कपात करून संकलित झालेला निधी / रक्कम **रोखीने/ धनादेश** स्वरुपात **"जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नांदेड"** यांचे नावाने बनवून **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, तहसिल कार्यालय आवार, नांदेड** यांचे कडे तात्काळ जमा करुन या राष्ट्रीय कार्यास मोलाचे योगदान देऊन सहकार्य करावे.

४. अधिक माहितीसाठी सु.ऑ.कॅप्टन विठ्ठल कदम (निवृत्त), कल्याण संघटक (मोबाईल-8698738998) आणि सार्जंट अनिल देवझे (निवृत्त), लिपिक (मोबाईल-8707608283) यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय नांदेड

(श्री महेश वडदकर)
निवासी उपजिल्हाधिकारी
तथा
जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड

संलग्न:
(i) मा.जिल्हाधिकारी महोदयांचे अर्धशासकिय पत्र
(ii) निधी संकलन विशेष मोहीम आवाहन पत्र

Dir NSS
27/03/25

Shri Shaikh
Do the needful
27/03/25

प्रत - **मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड** - उपरोक्त विषयान्वित पत्रासंबंधी माहितीस्तव

उपरोक्त साहित्य प्राप्त झाल्याबाबतची स्वाक्षरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (अ) | अधिकारी यांचे नाव | पद | मोबाईल नंबर | स्वाक्षरी |
| (ब) | कर्मचारी यांचे नाव | पद | मोबाईल नंबर | स्वाक्षरी |

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र
शासन

**श्री. राहुल कर्डिले** भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी**

जा.क्र. १३०४/जिसकका-४/२०२४-२५
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - ४३१६०१
दुरध्वनी : कार्या.: ०२४६२-३५९०५६
दिनांक : ०३-०३-२०२५

**विषय : "हाच संकल्प हिचसिध्दी" सशस्त्र सेना ध्वजादिन सन २०२४-२५ निधी संकलन राबविण्याबाबत.**

**संदर्भ : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मासैध्व२०२४/प्र.क्र.२०४/का-मासैक दि.१०/१२/२०२४**

प्रिय,

१. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित करण्यासाठी आपल्या जिल्हातील सर्व अधिकारी व कर्मचारी आणि विविध संघटना यांनी आपले उस्फूर्त योगदान देऊन आपणांस गतवर्षी शासनाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचे राष्ट्रीय कार्य उदार मनाने केले, याकरिता आपल्या अधिनस्त सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. यावर्षी नांदेड जिल्ह्याला शासनाने रु. ५०,५०,०००/- संकलनाचे उद्दिष्ट दिलेले आहे व हे उद्दिष्ट आपण लवकरात लवकर जमा करण्याचे ठरविले आहे, करिता आपण सर्वांनी सोबत जोडलेल्या आवाहन पत्रकानुसार सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून निधी जमा करुन संकलित झालेली रक्कम रोखीने/धनाकर्ष/धनादेश/ युपीआय ऑनलाईन स्वरुपात **जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती, नांदेड** यांचे नावाने बनवून **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नांदेड** येथे जमा करावी. तसेच सर्व विभाग प्रमुखांनी या आवाहन पत्रकाच्या प्रती **आपल्या स्वतःच्या अ.शा. पत्रान्वये अधिनस्थ सर्व कार्यालयांना वितरीत कराव्यात जेणे करुन या राष्ट्रीय कार्याची महती तळागाळापर्यंत पोहोचेल** व त्यांचा सुध्दा सक्रीय हातभार या उदात्त कार्यास लाभेल.

२. आपल्या विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाकडुन आवाहन पत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे योगदान मिळून ध्वजदिन निधी संकलन व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. या राष्ट्रीय कार्यास आपले तसेच आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे दरवर्षी प्रमाणेच भरीव योगदान लाभेल अशी मला खात्री आहे.

सहपत्र - एक आवाहन पत्र

प्रति, मा. कुलगुरु,
स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड.

**(श्री राहुल कर्डिले)**
जिल्हाधिकारी व
अध्यक्ष जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती,
नांदेड

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नांदेड

## "हाच संकल्प हिच सिध्दी"

सशस्त्र सेना ध्वजादिन सन 2024-25 निधी संकलन विशेष मोहीम

# आवाहन पत्र

प्रिय,

1. भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडी-अडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, त्याच प्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र सेना दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरिता सशस्त्रसेना ध्वजनिधीचा विनियोग केला जातो.

2. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी वर्ष 2024-25 करिता नांदेड जिल्ह्याने रुपये 1 कोटी जमा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. गतवर्षी आपण सर्व जिल्ह्यातील सर्व कार्यालियाकडुन व दानशूर व्यक्तीकडुन या मोहीमेद्वारे रु. 21,62,699/- निधी जमा करून जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले व या बाबत शासनाने जिल्ह्याचा गौरव स्मृतीचिन्ह प्रदान करुन केला आहे. देशहितासाठी केलेल्या या सहकार्याबाबत मी सर्व अधिकारी, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना व देणगीदारांना या कार्याबद्दल धन्यवाद देतो.

3. वर्ष 2024-25 कालावधीत आपणास रु. 1 कोटी जमा करायचे असल्याने हा निधी गोळा करण्यासाठी काही कार्यालियांना ध्वजानिधीदेणगी पावती पुस्तके पाठविण्यात आली आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील शासकिय / निमशासकिय / खाजगी संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून प्राधान्याने वैयक्तिक योगदानातुन / वेतनातुन कपात करून जास्तीत जास्त उभारुन या संकल्पनेला यशस्वी करुन उद्दीष्ट पुर्ती करुया व या पवित्र, अनमोल उदात्त राष्ट्रीय कार्यास सहकार्य करून एका नविन वेगळ्या वाटचालीला प्रारंभ करुया तथापी ही सक्ती नसुन आवाहन आहे. यासाठी खालील प्रमाणे निधी गोळा करण्याचे मी या पत्रद्वारे सर्वाना आवाहन करीत आहे.

| अ.क्र. | गट | निधीची रक्कम |
|---|---|---|
| 1. | गट- अ वरिल वरिष्ठ अधिकारी | रुपये 5000/- |
| 2. | गट- अ अधिकारी | रुपये 2000/- |
| 3. | गट- ब व तत्सम दर्जाचे अधिकारी | रुपये 1000/- |
| 4. | गट- क कर्मचारी | रुपये 600/- |
| 5. | गट- ड कर्मचारी | रुपये 300/- |
| 6. | **सामाजिक संस्था व इतर प्रतिष्ठित नागरिक** | स्वेच्छेनुसार |

4. या मोहिमेद्वारे जमा झालेला निधी स्कॅन/ऑनलाईन पेमेंट/बैंक ड्राफ्ट / धनादेश किंवा रोखीने **COLLECTOR & PRESIDENT, ZILLA SAINIKWELFARE OFFICE, NANDED** यांचे नावाने **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नांदेड** यांच्याकडे लवकरात लवकर जमा करुन सहकार्य करावे, आपल्या कार्यालियाद्वारे जमा झालेल्या रक्कमेच्या माहितीचा आढावा वेळोवेळी घेण्यात येईल, मला येथे हे नमूद करणे आवश्य वाटते की, सशस्त्रसेना ध्वजदिन निधी करीता दिलेली संपूर्ण रक्कम आयकर कायदा 1961, कलम 80 जी (5) (VI) अन्वये करमुक्त आहे. सदर संकल्प व त्याचा उद्देश समोर ठेवून आपण आपल्या जिल्ह्यात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलीत करण्यास मोलाचे सहकार्य कराल अशी आम्ही अपेक्षा करतो.

BQ00678203@mahb

SCAN FOR DONATION

BHIM RuPay

Paytm

PhonePe

G Pay

Merchant Services Provided By

Bank of Maharashtra

Branch 35

FLAG DAY FUND ACCOUNT, NANDED

FOR ONLINE PAYMENT

A/c No. 20067395537
Bank of Maharashtra
IFSC : MAHB 0000035
Mob. : 9422839037

COLLECTOR & PRESIDENT
Zilla Sainik Welfare Office, Nanded Flag Day Fund Account

आपला

**महेश वडदकर**
निवासी उप जिल्हाधिकारी,
जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड तथा
सचिव जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती, नांदेड

आपला

**राहुल कर्डिले**
जिल्हाधिकारी व
अध्यक्ष जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती,
नांदेड

Scanned with OKEN Scanner